दैनिक

अन्यायाचा प्रतिकार

# रायगड नगरी

महाराष्ट्राचा बुलंद आवाज..

रायगडसह ठाणे, नवी मुंबई, पुणे येथून प्रकाशित

● वर्ष १७ वे ● अंक ३५ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● शुक्रवार दि.६ मे २०२२ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

## सेंट्रल बँक ऑफ इंडिया संकटात; शेकडो शाखा बंद करणार

**नवी दिल्ली** : गेल्या काही वर्षांपासून तोट्यात चाललेल्या सरकारी बँकेने आपली आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी मोठा निर्णय घेतला आहे. यामध्ये ही बँक आपल्या जवळपास १३ टक्के शाखा बंद करणार आहे. साडेचार हजार शाखांवरून ही संख्या ६०० ने कमी करणार आहे. यामुळे बँकिंग क्षेत्रात मोठी खळबळ उडाली आहे.

सेंट्रल बँक ऑफ इंडियाने हा धक्कादायक निर्णय घेतला आहे. ही बँक आपल्या तोट्यात चाललेल्या शाखा एकतर बंद करेल किंवा त्यांचे अन्य शाखेत विलिनीकरण करेल. याबाबतचे वृत्त रॉय़टर्स वृत्तसंस्थेच्या हवाल्याने मनीकंट्रोलने दिले आहे. शंभर वर्षांहून अधिक काळ देशभरात कार्यरत असलेल्या सेंट्रल बँक ऑफ इंडियाच्या ४,५९४ शाखा आहेत. एकीकडे अन्य़ सरकारी बँका आपल्या शाखा वाढवत असताना ही सरकारी बँक मात्र ६०० शाखा बंद करण्याच्या प्रयत्नात आहे. रॉयटर्सच्या दाव्यानुसार ही बँक सध्या १३ टक्के शाखा बंद करण्याच्या तयारीत आहे. यासाठीचा प्रस्ताव असल्याचा दावा करण्यात आला आहे. यासंबंधीचे कागदपत्र ४ मे रोजीच बँकेच्या मुख्यालयातून अन्य शाखा आणि विभागीय कार्यालयांना पाठविण्यात आले आहेत.

### भिवंडीवाला ट्रस्ट जमीन गैरव्यवहार प्रकरणी

# उरणच्या तत्कालीन तहसिलदारांच्या विरोधात अखेर गुन्हा दाखल

**दै.रायगड नगरी । उरण**

उरणच्या तत्कालीन तहसिलदार श्रीमती कल्पना गोडे यांनी गैरमार्गाचा अवलंब करून भिवंडीवाला ट्रस्टच्या नावे असलेल्या मौजे चाणजे सर्व्हे क्र. ६१/१ , ६७/१ , ६७/२ आणि मौजे म्हातवली सर्व्हे क्र. १६, २७/१५,२७/१६ ता. उरण येथील सोळा कोटी पंचेचाळीस लाख रुपये किमतीची वीस एकर जमीन डोसू अरदेशीर भिवंडीवाला याच्या नावावर करण्याचे अत्यंत गंभीर प्रकरण सन २०१९ मध्ये उघडकीस आणले होते. सदरहू दोन्ही महसुली गावांतील सहा सातबारा उताऱ्यावर भिवंडीवाला ट्रस्टच्या नावाची स्पष्ट नोंद करण्यात आली आहे.

तसेच सदरहू डोसू भिवंडीवाला यांनी खोटा वारस दाखला सादर करून त्या आधारे खोटे आणि दिशाभूल करणारे प्रतिज्ञापत्र तत्कालीन तहसिलदार यांना सादर केले होते. विशेष म्हणजे, या प्रकरणी संबंधित मंडळ अधिकारी यांनी सदरहू जमीन भिवंडीवाला ट्रस्टच्या नावे असल्याने आणि वारस दाखला गैरलागू असल्याने सदरहू जमीन एका व्यक्तीच्या नावे होऊ शकत नाही असा स्पष्ट अहवाल सादर केलेला आहे. असे असतानाही तत्कालीन तहसिलदार श्रीमती कल्पना गोडे यांनी डोसू भिवंडीवाला यांच्याशी संगनमत करून आणि भ्रष्ट मार्गाचा अवलंब करून सर्व सहा सातबारा उताऱ्यावरील ट्रस्टचे नाव कमी करण्यासाठी आणि सदरहू जमीन डोसू भिवंडीवाला यांच्या नावे करण्यासाठीचे आदेश पारित केले आहेत.

सदरहू ट्रस्ट सर खान बहादूर होरमसजी माणेकजी भिवंडीवाला सी–६५८ धर्मादाय आयुक्त, मुंबई येथे नोंदणीकृत आहे. संस्थेने माहितीच्या अधिकाराखाली मिळविलेल्या महत्वपूर्ण कागदपत्रांतून हे सर्व प्रकरण उघडकीस आले आहे. उरण सामाजिक संस्थेने संबंधित तहसिलदार यांच्यावर कारवाई होण्यासाठी राज्याचे मुख्य सचिव, धर्मादाय आयुक्त मुंबई, जिल्हाधिकारी रायगड यांच्याकडे मार्च २०१९ मध्ये कागदपत्रांच्या पुराव्यासह तक्रार नोंदवली आहे.

दरम्यान या बाबतची माहिती भिवंडीवाला ट्रस्टच्या इतर सदस्यांना मिळाली. त्यांनी स्वतंत्र चौकशी केली असता सदरहू डोसू भिवंडीवाला यांनी वर नमूद खोट्या वारस दाखल्याच्या आधारे भिवंडीवला ट्रस्टच्या नावे असलेली उरण आणि पनवेल तालुक्यातील शेकडो एकर जमीन स्वत:च्या नावे करून इतरांना विकल्याचे व काही सिडको संपादित जमिनीच्या मोबदल्यात साडेबारा टक्के भूखंड मिळवून शासनाची शेकडो कोटी रूपयांची फसवणूक केल्याचेही उघड झाले असून वरील पार्श्वभूमिवर भिवंडीवाला कुटुंबातील श्रीमती फरीदा दुबाश या महिलेने मुंबई येथील लोकमान्य टिळक मार्ग पोलिस ठाणे येथे १५ मार्च २०२२ रोजी गुन्हा क्र.०११५ दाखल केला असून त्यात डोसू अरदेशीर भिवंडीवाला आणि तत्कालीन तहसिलदार, उरण यांचा नामोल्लेख करण्यात आला असल्याची माहिती उरण सामाजिक संस्थेचे अध्यक्ष सुधाकर पाटील यांनी दिली आहे.

## प्रकल्पग्रस्त स्वत:च्या भूमीत भाडेपट्ट्याने राहणार नाही : रामशेठ ठाकूर

**दै.रायगड नगरी । पनवेल**

**९५ गावातील शेतकऱ्यांची जमीन घेऊन अनेक प्रकल्प सिडकोने उभारले, मात्र आता गरजेपोटी घरांच्या बाबतीत सिडको व शासनाने घेतलेला निर्णय अन्यायकारक आहे, त्यामुळे या भूमीची मालकी हक्क असलेला प्रकल्पग्रस्त भूमिपुत्र सिडकोने लादलेल्या निर्णयाच्या विरोधात असून येथील प्रकल्पग्रस्त स्वतःच्या मालकीच्या भूमीत भाडे पट्ट्याने राहणार नाही, असा इशारा माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी आज येथे आयोजित करण्यात आलेल्या गरजेपोटी बांधकाम नियमन बैठकीत दिला. तसेच प्रकल्पग्रस्तांच्या हक्कासाठी २४ जूनच्या नियोजित आंदोलनाप्रमाणे या विषयावरही आंदोलन करण्याचा इशाराही त्यांनी यावेळी दिला.**



शहरातील महात्मा ज्योतिबा फुले सभागृहात लोकनेते दि. बा. पाटील आंतरराष्ट्रीय विमानतळ नामकरण सर्वपक्षीय कृती समितीच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या या बैठकीस समितीचे अध्यक्ष दशरथ पाटील, भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, भाजपचे तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, समितीचे संतोष केणे, जे. डी. तांडेल, दशरथ भगत, राजाराम पाटील, २७ गाव समितीचे अध्यक्ष नंदराज मुंगाजी, रुपेश धुमाळ, नगरसेवक मनोज भुजबळ, मनोहर म्हात्रे, युवा नेते दशरथ म्हात्रे, राजेश गायकर, विनोद म्हात्रे, प्रभाकर जोशी, तसेच पदाधिकारी व प्रकल्पग्रस्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

लोकनेते दि. बा. पाटील आंतरराष्ट्रीय विमानतळ नामकरण सर्वपक्षीय कृती समितीने सातत्याने चालवलेल्या आंदोलनाने जागे झालेल्या सिडको व शासनाने प्रकल्पग्रस्तांच्या गरजेपोटी बांधकामासंदर्भात नुकताच एक शासन निर्णय घेतला आहे. मात्र तो निर्णय प्रकल्पग्रस्तांच्या हिताचा न घेता सिडको आणि शासन यांना सोयीस्कर पडावा असा आहे. विशेष म्हणजे एक अर्जाचा नमुना प्रकल्पग्रस्तांनी भरून द्यावा असे आवाहन सिडकोतर्फे करण्यात आले आहे. मात्र सदरचे निर्णय करताना प्रकल्पग्रस्त संघटना व त्यांच्या प्रतिनिधीनींकडून कुठल्याही सूचना न मागवता हा निर्णय प्रसिद्ध केला आहे. त्यामुळे पुन्हा एकदा सिडकोने प्रकल्पग्रस्तांच्या हक्कांविरोधात डाव रचला आहे. प्रकल्पग्रस्तांच्या २५० मीटर बाहेरील बांधकामांचे काय होणार याचे उत्तर सिडकोकडून अनुत्तरित आहे. त्याचबरोबर प्रत्येक गावची भौगलिक सीमा वेगवेगळी आहे. काही गावे महामार्ग किंवा खाडी लगत आहेत. तेथे एकाच दिशेस २५० मीटर पेक्षा जास्त बांधकामे वाढलेली आहेत, त्या गावातील प्रकल्पग्रस्तांच्या बांधकामाचे काय?, प्रकल्पग्रस्तांच्या व्यावसायिक गाळ्यांचे काय?, मालकी हक्काची मालमत्ता सोडून प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांनी ती भाड्याने नावावर करण्याची संमती सिडकोकडे का मागावी?, बांधकामे नियमित करण्याचा दर हा शेतकऱ्यास जमिनीस मिळालेला दर अधिक सिडको डेव्हलपमेंट चार्ज एवढाच का नसावा?, बांधकामे नियमित करीत असताना भूखंड पात्रतेची माहिती कशासाठी मागवली जात आहे. असे अनेक प्रश्न या बैठकीत उपस्थित झाले

…/२

## अवैध लाकूडतोडी व खैर तस्करांना पोलादपूर हद्दीत जेरबंद

**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

वनविभाग पोलादपूरच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी एकाच आठवड्यात दोनवेळा केलेल्या कारवाईत दोन ट्रकसह पावणेदोन लाखांच्या मालासह दोन ट्रक असा एकूण १६लाख ८२ हजारांचा मुद्देमाल हस्तगत केला.अवैध लाकूडतोडी व खैर तस्करांना पोलादपूर हद्दीत जेरबंद केल्याने महाड व पोलादपूर तालुक्यातील वनमाफियांना चांगलीच चपराक बसली आहे.

रोहे येथील उपवनसंरक्षक अप्पासाहेब निकत, व सहाय्यक वनसंरक्षक विश्वजित जाधव तसेच महाडचे वनक्षेत्रपाल राकेश साहू यांच्या मार्गदर्शनाखाली मिळालेल्या गुप्त बातमी वरून, पोलादपूर परिमंडळ वन अधिकारी शाम गुजर, वनरक्षक प्रशांत गायकर, नवनाथ मेटकरी, दिलीप जंगम, सचिन मेने, निलेश नाईकवाडे, प्रियांका जाधव यांनी मुंबई गोवा महामार्गावर पोलादपूर शहराबाहेर असणाऱ्या वनउपज तपासणी नाका येथे दि.२९ एप्रिल २०२२ रोजी ट्रक क्र.केए ५६०६२२ ला तपासणी केली असता त्यामध्ये अवैध वृक्ष तोडीचा विना वाहतूक परवान्याचे

…/२



### संक्षिप्त...

## राज ठाकरेंना अयोध्येत पाऊल ठेवू देणार नाही

**दै.रायगड नगरी । मुंबई**

मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या अयोध्या दौऱ्याला भाजप खासदार ब्रिजभूषण यांनी विरोध केला आहे. राज ठाकरे यांनी जाहीर सभांमधून अनेक वेळा उत्तर भारतीयांचा अवमान केला आहे. त्यांनी अगोदर उत्तर भारतीयांची माफी मागावी आणि नंतरच अयोध्येत पाऊल ठेवावं, जर त्यांनी माफी मागितली नाही तर त्यांना अयोध्येत पाऊल ठेऊ देणार नाही, अशी उघड धमकीच ब्रिजभूषण यांनी दिली आहे. राज ठाकरे यांनी जहाल हिंदुत्वाची शाल पांघरल्यानंतर त्यांनी ३ जाहीर सभा घेतल्या. पाडव्याच्या शिवतीर्थावरील सभेत त्यांनी रणशिंग फुकलं. पुढे ठाण्यातल्या उत्तर सभेत आणि औरंगाबादेतील सभेत त्यांनी मशिदीवरील भोंग्यांबाबत आक्रमक भूमिका घेत हिंदुत्ववादाची भूमिकेला आणखी धार लावली. तत्पूर्वी पुण्यातील पत्रकार परिषेद त्यांनी येत्या ५ जून रोजी अयोध्या दौऱ्याची घोषणा केली. आपल्या शेकडो कार्यकर्ते पदाधिकाऱ्यांसह अयोध्या दौऱ्यावर जाणार असल्याची घोषणा राज ठाकरे यांनी केली. त्यांच्या याच दौऱ्याला भाजप खासदार ब्रिजभूषण यांनी विरोध केला आहे. राज ठाकरे यांच्या अयोध्या दौऱ्याला विरोध करताना ब्रिजभूषण यांनी म्हटलं आहे, राज ठाकरे जोपर्यंत उत्तर भारतीय लोकांची माफी मागत नाहीत तोपर्यंत मी त्यांना अयोध्येत पाऊल ठेऊ देणार नाही. उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांना मी सल्ला देऊ शकत नाही, पण लोकांच्या भावना लक्षात घेता मी त्यांना विनंती केली आहे की, जोपर्यंत राज ठाकरे उत्तर भारतीयांची माफी मागत नाही तोपर्यंत तुम्ही त्यांना भेटू नका

# नेरे सबस्टेशनच्या कामाला ग्रहण

### सबस्टेशनचे काम ५ वर्षापासून रखडलेलेच

**दै.रायगड नगरी । पनवेल**

तालुक्यातील नेरे येथे महावितरणकडून साधारण ५ वर्षापूर्वी सबस्टेशन बांधण्यात येणार होते. मात्र कंत्राट मिळाल्यानंतर काही महिन्यातच कंत्राटदाराने आपला गाशा गुंडाळल्याने सबस्टेशनचे काम कित्येक वर्षापासुन रखडले आहे. याचा फटका आजूबाजूच्या गावांना बसत आहे. नेरे येथील सब स्टेशनसाठी महावितरणकडून अक्षम्य दुर्लक्ष केले जात असल्याचा आरोप स्थानिकांकडून केला जात आहे. त्यामुळे या भागातील नागरिक, शेतकर्यांना अनंत अडचणीचा सामना करावा लागत आहे. आता तरी या समस्येतून मुक्तता देण्यासाठी नेरे या ठिकाणी सबस्टेशन उभारावे अशी रास्त अपेक्षा व्यक्त होत आहे.

तालुक्यातील काही गावांमध्ये महावितरणचे तीन तेरा वाजले असल्याचे चित्र दिसत आहे. तालुक्यातील विजेच्या वाढत्या मागणीमुळे वारंवार वीज पुरवठा खंडित होण्याच्या घटना घडत आहेत. नेरेमध्ये सस्बस्टेशन न झाल्यामुळे हे प्रमाण वाढत चालले असल्याचे येथील रहिवाशीयांचे म्हणणे आहे. सबस्टेशनचे काम रखडल्यामुळे आजूबाजूच्या गावांवरील विजेवर त्याचा परिणाम होत आहे. १०० किलोमीटर पेक्षा अधिक विजेच्या तारा पनवेल परिसरातून वाहून नेण्यात आलेल्या आहेत. त्यामुळे वे–ळोवेळी वीजपुरवठा खंडित होण्याचे प्रकार घडत आहेत. यासाठी तालुक्यातील सुकापूर, नेरे व गव्हाण येथे सबस्टेशन उभारण्याचे महावितरणकडून ठरविण्यात आले. मात्र नेरे येथील सब स्टेशनचे काम ५ वर्षापासून रखडले आहे. दोन वेळा नेरे सबस्टेशनचे काम मंजूर होऊन देखील काम पूर्ण होत नसल्याने नेरे येथील सब स्टेशन होईल कि नाही याबद्दल साशंकता आहे.

नेरे सब स्टेशनचे काम २०१६ मध्ये काम सुरु करण्यात आले. साडे तीन कोटी रुपयांचा खर्च करून या सब स्टेशनचे काम मार्च २०१७ पर्यंत काम पूर्ण होणार होते. या सबस्टेशनमुळे आजूबाजूच्या ४५ ते ४८ गावांना याचा फायदा होणार होता. वारंवार खंडित होणारा वीजपुरवठा यामुळे कमी होणार होता. सबस्टेशनचे काम सुप्रीम इन्फ्रा कंपनीला देण्यात आले होते. या सबस्टेशनमधून तीन फिडर निघणार होते. मात्र २०१७ मध्ये या कंपनीने काम अर्धवट सोडल्याने सबस्टेशनचे काम रखडले. २०१९ मध्ये नेरे सबस्टेशनचे काम सुदर्शन इंजिनिअरगला मिळाले. काम पूर्ण करण्याची त्याची देखील मुदत संपलेली आहे. मात्र काम पूर्ण झालेले नाही. नेरे विभागात जवळपास २० ते २२ हजार विजेचे ग्राहक आहेत. ४५ ते ४८ गाव वाडयांचा यात समावेश होतो. विद्युत पुरवठा हे अंतर जवळपास ९६ किमी परिसराची लाईन आहे.

काही काळापासून परिसरात बालाजी सिंफनीमधून विद्युत पुरवठा केला जात आहे. हे अंतर ८० किलोमीटर लाईनचे आहे. एवढी मोठी लाईन असल्याने कुठेही काही समस्या आली तर सर्व ग्राहकांना याचा नाहक त्रास सहन करावा लागतो. या ठिकाणाहून जवळपास दोन कोटी वीज बिल वसुली केली जाते.

…/२

## आदिवासी वाडयांचा मालमत्ता कर रद्द करण्याची शिवसेनेची आयुक्तांकडे मागणी




**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल महानगर पालिकेच्या अंतर्गत असणाऱ्या खारघर शहरा मधील हैदरवाडी, फणसवाडी, चाफेवाडी, बेलपाडावाडी, धोमोळेवाडी इत्यादी आदिवासी वाड्यातील आर्थिक दृष्ट्या दुर्बल असणा–या आदीवासी नागरिकांना ग्रामपंचायतीच्या माध्यमातुन पक्की घरे बांधुन देण्यात आली आ–हेत. ग्रामपंचायत कार्यरत असतांना त्याच्याकडून नाममात्र रू. २५०.०० घरपट्टी आकारली जायची परंतु पनवेल महानगर पालिका अस्तित्वात आल्या नंतर या गोर गरीब आदिवासी बांधवांना वीस ते पन्नास हजार रूपये प्रमाणे मालमत्ता कराची बिले कार्यालयाकडून पाठविण्यात आलेली आहेत. हे अन्याय कारक असून

…/२

## तहसीलदार अय्युब तांबोळी यांनी केली सुभाषनगर डोंगरकड्याची पाहणी

### मुख्याधिकारी अनुप दुरे यांचीही उपस्थिती ; जेष्ठ पत्रकार ओव्हाळ यांच्या प्रयत्नांना यश

**दै.रायगड नगरी । खोपोली**

येथील सुभाषनगर मस्को कॉलनी परिसरातील डोंगरकड्याची पाहणी करीत खालापूर तहसीलदार अय्युब तांबोळी यांनी धोकादायक परिसरात संरक्षण जाळी टाकण्याबाबत खोपोली नगर परिषदेचे मुख्याधिकारी अनुप दुरे यांना सुचना दिल्या.



डोंगर पायथ्याशी असलेल्या सुभाषनगर परिसराला दर पावसाळ्यात धोकादायक घोषित केले जाते. ३–५ हजार लोकसंख्या असलेल्या सुभाषनगर परिसराला धोकादायक डोंगरकड्यापासून संरक्षण मिळावे, यासाठी संरक्षण भिंत उभारण्याची मागणी मागील अनेक वर्षापासून जेष्ठ पत्रकार पहिलवान हनुमंतराव ओव्हाळ व रायगड संघर्ष समिती करीत आहे. पावसाळा काही दिवसांवर येवून ठेपला असताना सुभाषनगर परिसराची अवस्था पुण्याच्या माळीण गावासारखी होवू नये, यासाठी जेष्ठ पत्रकार पहिलवान हनुमंतराव ओव्हाळ, अखिल भारत जर्नालिस्ट फेडरेशन महाराष्ट्र राज्य महासचिव खलील सुर्वे व राष्ट्रीय उपाध्यक्ष फिरोज पिंजारी यांनी संरक्षण भिंत उभारण्याची आग्रही मागणी केली होती. या मागणीची दखल घेत तहसीलदार अय्युब तांबोळी यांनी मुख्याधिकारी अनुप दुरे यांच्यासोबत परिसराची पाहणी केली.

सायंकाळी ५ वाजता आपल्या लवाजमासह तहसीलदार अय्युब तांबोळी व मुख्याधिकारी अनुप दुरे हे सुभाषनगर येथे दाखल झाले. साईबाबा मंदिर, मस्जिद परिसर व गणेश मंदिर परिसरातील डोंगरकड्याची पाहणी करून धोकादायक भागात तत्काळ संरक्षण जाळी टाकण्याबाबत यावेळी चर्चा करण्यात आली. लवकरात लवकर प्रस्ताव तैयार करून संबंधित विभागांशी चर्चा करून कामाला सुरुवात करण्यात येईल, असे यावेळी तहसीलदार अय्युब तांबोळी यांनी सांगितले. यावेळी जेष्ठ पत्रकार पहिलवान हनुमंतराव ओव्हाळ, भाजप युवानेते राहुल जाधव, अखिल भारत जर्नालिस्ट फेडरेशन राष्ट्रीय उपाध्यक्ष तथा केपी न्यूज चैनल एडीटर इन चिफ फिरोज पिंजारी, अखिल भारत जर्नालिस्ट फेडरेशन महाराष्ट्र राज्य महासचिव तथा आम आदमी पार्टी तालुकाध्यक्ष खलील सुर्वे, तलाठी कवळे, खोत अण्णा, रमाकांत बेहरे, खोपोली नगर परिषदेचे लगाडे, इंजि. शितिष हडप आदी उपस्थित होते.

# जागा उपलब्ध करून द्या, सुसज्ज स्टेडीयम बांधून देतो : आ.जयंत पाटील



दै.रायगड नगरी । पाली/बेणसे

कबड्डी हा तांबड्या मातीतील मर्दानी व रांगडा खेळ असून सध्या हा खेळ देशविदेशात लोकप्रीय ठरत आहे. या अस्सल मातीतील खेळाला सध्या ग्लॅमर प्राप्त झाले आहे. रायगड कबड्डी खेळाची पंढरी असून या मातीतून भविष्यात देशाच्या कबड्डी संघाचे नेतृत्व करणारे खेळाडू रायगडच्या मातीतून निर्माण होतील असा विश्वास जयंत पाटिल यानी व्यक्त केला. रासळ या गावाशी जुने नाते असून स्व. शांताराम खाडे यांच्या नेतृत्वाखाली आम्ही काम केले आहे. रासळ सारख्या गावात आपण अशा भव्य दिव्य स्पर्धा भरविता याचा मला आनंद होत आहे. जर आपण जागा उपलब्ध करून दिलीत तर माझ्या फंडातून सुसज्ज असे स्टेडीयम बांधून देतो. आम्ही जो शब्द देतो तो पाळतो. असे पाटिल म्हणाले.स्व. महादेव बापुराव खाडे स्मृती चषकाचे आयोजन जय हनुमान रासळ या मंडळाच्या वतीने करण्यात आले होते.

या जिल्हा स्तरीय स्पर्धाचे आयोजन उपसरपंच नरेश खाडे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते. यावेळी उद्घाटक म्हणून उपस्थित आमदार भाई जयंत पाटील बोलत होते. यावेळी पाटिल यांनी नरेश खाडे यांचे तोंडभरून कौतुक केले. उत्कृष्ट संसदपटू ठरलेले धैर्यशिल पाटील यांना पुन्हा आमदार करायचे असून गीता पालरेचा यांनी त्रास देऊ नये असा आ.पाटिल यांनी राष्ट्रवादीला हस्त हसत टोलाही लगावला. राष्ट्रीय स्तरावर नेतृत्व करण्यासाठी सुधागड सह जिल्ह्यातील खेळाडूंना शेकापच्या माध्यमातून आवश्यक ते सहकार्य केले जाईल अशी ग्वाही जयंत पाटिल यांनी दिली. .भाई जयंत पाटील पुढे म्हणाले की, शेतकरी कामगार पक्षाची नाळ ही सर्वसामान्य जनतेशी जुळलेली आहे. कुणी येतील, कुणी जातील मात्र विकास करण्याचे काम फक्त शेतकरी कामगार पक्षच करू शकतो. भाई जयंत पाटील यानी आपल्या भाषणात सुरेशशेठ खैरे यांचीही कौतुक करून सुरेशशेठ खैरे हे वडील नामदेवशेठ खैरे यांच्या सारखेच ताकतीने जनसेवा व विकासकामे करीत आहेत. कमी बोलणारे पण विकासकामे झपाट्याने करणारे असे सुरेशशेठ खैरे हे संपुर्ण जिल्हाला परिचित आहेत. ते पुढे म्हणाले की, कबड्डीसारखा खेळ हा गावागावात खेळला गेला पाहीजे. यावेळी माजी आमदार धैर्यशिल पाटिल म्हणाले स्पर्धेतील खेळाडुंनी उत्कृष्ट व दर्जे दार खेळाचे सादरीकरण करावे व कबड्डी रसिकांच्या मनावर अखंड अधिराज्य गाजवावे. प्रत्येक खेळाडूने खिलाडूवृत्तीने जय पराजयाचा स्विकार करावा. असे पाटिल आपल्या मार्गदर्शनात म्हणाले. ग्रामीण भागातील उदयोन्मुख व होतकरू खेळाडूना अशाप्रकारच्या स्पर्धांतून प्रोत्साहन मिळत असते. या स्पर्धेत उत्कृष्ट व दर्जेदार खेळ सादर करून पुढे हेच खेळाडू राष्ट्रीय स्पर्धेत चमक दाखवण्यास सज्ज होतात. हेच खेळाडू पुढे जिल्हा व राज्याचे देशपातळीवर नावलौकिक करतात. असे धैर्यशील पाटिल म्हणाले.

यावेळी माजी आमदार धैर्यशिल पाटील, सुरेशशेठ खैरे, नगराध्यक्षा गीताताई पालरेचा, उपनगराध्यक्ष आरिफभाई मणियार, अॅड. सुभाष पाटील, नगरसेवक पराग मेहता, संजोग शेठ, जे. बी. गोळे सर, गोविंद तळेकर, उद्योजक जित मल्होत्रा यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अध्यक्ष नितीन लहाने, कार्याध्यक्ष चेतन तेलंगे, सेक्रेटरी परेश खाडे, खजिनदार अक्षय खाडे यांच्यासह सर्व ग्रामस्थांनी विशेष मेहनत घेतली.

# आ.महेंद्र थोरवे यांची प्रमुख उपस्थिती : माथेरानकरांनी जल्लोषात साजरी केली शिवजयंती !

दै.रायगड नगरी । माथेरान

माथेरान मध्ये अक्षयतृतीयेला तिथीनुसार माथेरान करांनी शिवजयंती मोठ्या आनंदाने आणि जल्लोषात साजरी केली. यावेळी समस्त शिवसैनिकांच्या आग्रहास्तव कर्जत खालापूर मतदार संघाचे कार्यसम्राट आमदार महेंद्रशेठ थोरवे यांची प्रमुख उपस्थिती होती.

हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज हे एक श्रद्धास्थान व स्फूर्तिस्थान असून त्यांची शिवजयंती हा महाराष्ट्रातील एक सण व उत्सव आहे. या माथेरान मध्ये अक्षयतृतीयेच्या शुभ मुहुर्तावर तिथीनुसार शिवजयंती उत्सव साजरा करण्यात आला. पारंपरिक पद्धतीने येथे शिवजयंती साजरी करण्यात आली.यामुळे माथेरान नगरी मधील संपूर्ण वातावरण हे शिवमय झालेले होते.

माथेरान मध्ये अनेक वर्षापासून शिवसेनेच्या व माथेरानकरांच्या वतीने अक्षयतृतीयेच्या शुभ मुहुर्तावर तिथीनुसार शिवजयंती उत्सव साजरा करण्यात येतो.मागील दोन वर्षातील कोरोनामुळे सर्वच उत्सव आणि सणांवर बंदी घालण्यात आली होती. परंतु आत्ता राज्यात सण व उत्सव साजरे करण्यासाठी सर्वत्र निर्बंध उठविले आहेत. आणि यामुळेच माथेरान मध्ये बुधवार दि.३ रोजी अक्षयतृतीयेला सकाळ पासूनच माथेरान नगरी शिवमय झाली होती. सकाळी ठीक १०:३० वा. माथेरानच्या मध्यवर्ती ठिकाणी श्री राम चौक येथे शिवसेनेच्या महिला संघटिका संगीता जांभळे यांच्या शुभहस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. त्यानंतर ठीक ११:३० वा.छत्रपती शिवाजी महाराज उद्यान येथे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास माथेरान शिवसेना शहर प्रमुख चंद्रकांत चौधरी यांच्या शुभहस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला. तसेच नौरोजी उद्यानातील हुतात्मा भाई कोतवाल यांच्या पुतळ्यास युवासेना अध्यक्ष निमेश मेहता यांच्या शुभ हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला. आणि स्वातंत्र्य सैनिक स्तंभास युवती सेनेच्या माधुरी बिरामणे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला. या नंतर दुपारी छत्रपती शिवाजी महाराज मार्ग येथील शिवपुतळ्यास शिवसेनेच्या माजी नगरसेविका कीर्ती मोरे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला. आणि सायंकाळी ठीक ७:०० वाजता निर्बंध मुक्त वातावरणात,शिवशाही थाटात शिवप्रतिमेची भव्य मिरवणूक काढण्यात आली.नेत्र दिपक अशी फटाक्यांची आतिषबाजी आणि ढोल ताश्यांच्या गजरात माथेरान मधील वातावरण शिवमय झाले होते.

या भव्यदिव्य मिरवणूकीत कर्जत-खालापूरचे लोकप्रिय आमदार महेंद्र थोरवे, रायगड जिल्हा महिला प्रमुख रेखा ठाकरे, तालुका प्रमुख उत्तम कोळंबे तसेच कर्जत तालुका युवासेना उपधिकारी प्रसाद थोरवे आदि मान्यवर शिवसैनिक मंडळी उपस्थित होती. माथेरान मधील शिवजयंती उत्सव साजरा करण्यासाठी शहर प्रमुख चंद्रकांत चौधरी यांच्या नेतृत्वाखाली उपशहर प्रमुख प्रमोद नायक, योगेश जाधव महिला संघटिका संगीता जांभळे, माजी नगराध्यक्ष मनोज खेडकर, तसेच मीरा फाऊंडेशनच्या रेखा चौधरी, स्मिता शिंदे आणि युवा सेनेचे अंकिता तोरणे, निधी जाधव, किशोर धनावडे, गौरंग वाघेला, निखिल शिंदे, जय शिंदे, अमोल चौगुले, शैलेश वाघेला, हेमंत पवार, दिनेश कदम, विजय चव्हाण, अनिल नाईकडे आणि यांच्या बरोबर जेष्ठ शिवसैनिक रघुनाथ कदम, ज्ञानेश्वर बागडे, माजी नगरसेवक संदिप शिंदे, अनिकेत जाधव, प्रकाश सुतार, रविंद्र सुतार, उमेश कदम, मनोहर रांजणे आणि आजी माजी पदाधिकारी, महिला आघाडीच्या सर्व सदस्या आणि असंख्य शिवसैनिक व शिवप्रेमींची या मिरवणुकीत लक्षणीय उपस्थिती होती.



# रमजान ईदी निमित्ताने मुस्लीम बांधवांना फराळाचे साहित्य वाटप : अब्दुल पिरभोय यांचा पुढाकार

दै.रायगड नगरी । माथेरान

माथेरान मधील दानशूर व्यक्तिमत्त्व असणारे हॉटेल वे साईड इन चे मालक अब्दुल हुसेन अली पिरभोय यांच्या पुढाकाराने रमजान ईदी निमित्ताने येथील मुस्लिम बांधवांना फराळाचे साहित्य वाटप करण्यात आले होते. यावेळी सर्वानी याचा लाभ घेतला.



हॉटेल व्यावसायिकांमध्ये एकमेव दानशूर व्यक्तिमत्त्व म्हणून हॉटेल वे साईड इन चे मालक अब्बास अली हुसेन पिरभोय यांचे नाव आदराने घेतले जाते. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर लॉक डाऊनच्या कठीण काळात त्यांनी अनेक गरजवंतांना जीवनावश्यक वस्तूंच्या किट्स वाटप केल्या होत्या तर अश्वपालकांसाठी पशु खाद्य उपलब्ध करून दिले होते. तर हातगाडी ओढणाऱ्या श्रमिकांना मोफत भोजनाची व्यवस्था आपल्या हॉटेल वे साईड इन मध्ये केली होती. आजही अब्बास अली हुसेन पिरभोय हे सातत्याने इथल्या गोरगरिबांना नेहमीच मदतीला धावून जात आहेत.

शालेय विद्यार्थ्यांना मोफत शैक्षणिक साहित्य वाटप करत असून विधवा महिलांना दर महिन्याला जीवनावश्यक वस्तूंचे वाटप करीत आहे. अशा या निस्वार्थी व्यक्तिमत्वाचे सर्वच स्तरातून कौतुक केले जात आहे. त्याना वे साईड इन हॉटेलचे व्यवस्थापक मेहमूद भाई आणि सर्व कर्मचारी वर्ग सहकार्य करीत असतात.

# गोठ्याला आग चार जनावरे होरपळली ; एकाचा मृत्यू



दै.रायगड नगरी । पोलादपूर

तालुक्यातील पांगळोली गावातील भूमिहिन शेतकऱ्याच्या गोठ्याला बुधवारी दुपारनंतर अचानक आग लागून चार गुरे होरपळली आणि त्यापैकी एका बैलाचा मृत्यू झाल्याची माहिती प्राप्त झाली आहे. पोलादपूर तालुका कार्यालयाने तहसिलदार दिप्ती देसाई यांच्या आदेशानुसार तातडीने पंचनामा केला आहे.

पोलादपूर तालुक्यातील पांगळोली येथील लोकांची शेतजमिन तोंडी भाड्याने घेऊन कसणारे परशुराम दाजी उपाळे यांच्या कुटूंबियांची केवळ म्हशी, गायी या चार-पाच पाळीव जनावरांवरच उपजिवीका अवलंबून होती. बुधवारी दुपारी दि. ४ मे २०२२ रोजी दुपारी ४ वाजल्यानंतर गोठयास आकस्मिक आग लागल्याने या दुर्घटनेत ही गुरे जनावरे होरपळून गंभीर जखमी झाली आहेत. यापैकी एका बैलाचा मृत्यू आगीच्या भक्ष्यस्थानी पडून झाला आहे.

पृष्ठ क्र.१ वरुन...

## प्रकल्पग्रस्त स्वत:च्या भूमीत भाडेपट्ट्याने राहणार नाही : रामशेठ ठाकूर

आहेत. शासन निर्णयात प्रकल्पग्रस्तांच्या बाबतीत सिडको व पर्यायाने शासनाची उदासीनता उघड झाली आहे. त्या अनुषंगाने सिडकोला व शासनाला लेखी पत्र देण्यात येणार असल्याचे या बैठकीत सांगण्यात आले. तसेच हक्कासाठी लढणार... इतिहास घडविणार! असा समय वजा इशारा या बैठकीतून सिडको व शासनाला देण्यात आला.

पुढे बोलताना लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी सांगितले कि, नवी मुंबई विमानतळाला लोकनेते दि. बा. पाटील यांचे नाव लागलेच पाहिजे हा आपला एक प्रमुख लढा आहे, त्याचबरोबर येथील प्रकल्पग्रस्तांचे प्रश्न सोडविणे हे सुद्धा या लढ्यातील भाग असून प्रकल्पग्रस्तांवर अन्यायाची वेळ येईल त्यावेळी या लढ्याला धार देण्याचे काम आपल्याला करत राहून त्यांना न्याय मिळवून द्यायचा आहे आणि त्यासाठी रस्त्यावर उतरण्याची आपली कायम तयारी असल्याचे लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी सांगून प्रकल्पग्रस्तांना मोठा धीर दिला. ९५ गावातील लाखो प्रकल्पग्रस्त आणि त्यांची लाखो घरे आहेत. अनेकांची पाच पाच एकर जागा सिडकोने संपादित केली आहे. घरे नियमित करण्यासाठी भरमसाठ रक्कम सिडकोकडून आकारली जाणार आहे. प्रकल्पग्रस्तांची एवढी जागा घेऊनही जर प्रकल्पग्रस्त भाडेपट्टीवर राहण्यास सक्ती करत असाल तर ते आम्हाला कदापिही मान्य नाही. विमानतळाला दिबासाहेबांचे नाव देण्यासाठी बॅनरवर सह्या करणारे महाविकास आघाडीचे स्थानिक नेते मागे हटले, आता प्रकल्पग्रस्तांच्या घरांच्या बाबतीतही मागे हटणार का? असा सवाल उपस्थित करून प्रकल्पग्रस्तांची घरे नियमित करण्याबाबत स्थानिक महाविकास आघाडीच्या नेत्यांची काय भूमिका आहे हे जाहीर करा, असे आव्हानही लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी दिले. तसेच २०१५ साली तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सरसकट बांधकाम नियमित करण्याचे आदेश दिले होते, याची आठवणही त्यांनी या बैठकीतून शासनाला करून दिली. तसेच घरे नियमित करण्याच्या आडून सिडको प्रकल्पग्रस्तांच्या मानगुटीवर बसण्याचा प्रयत्न करत असेल तर तो प्रयत्न हाणून पाडू या, असे आवाहनही त्यांनी प्रकल्पग्रस्तांना या बैठकीतून केले.

## अवैध लाकूडतोडी व खैर तस्करांना पोलादपूर हद्दीत जेरबंद

आकेशिया घनमीटर १३.५८७ आकाराचे ५४ नग किंमत ५० हजार ४९० रुपये व ट्रक अंदाजे किंमत ६ लाख रूपयांचा मुद्देमाल जप्त करून आरोपी झाकिउद्दिन मोहमद हुसेन (रा.त्रिपुरानाथ) व हावप्पा उर्फ अविनाश चिंचोलीकर (रा.त्रिपुरानाथ,कर्नाटक)या दोघांवर वन कायद्याचे उल्लंघन केल्याप्रकरणी गुन्हा नोंद करून कारवाई केली.

यानंतर दि. ०२ मे २०२२ रोजी तपासणी नाक्यावरच ट्रक (क्र.एमएच०५के ९५३८) ची तपासणी केली असता त्यामध्ये अवैध वृक्ष तोडीचे वाहतूक परवाना नसलेले खैराचे ८.९२८ घ.मी. आकारमानाचे सोलीव ३७० नग १ लाख ३० हजार २५ रूपये अंदाजे किंमत व ट्रक अंदाजे किंमत ६ लाखाचा मुद्देमाल जप्त करून व आरोपी भोलानाथ धर्मराज यादव, रा.आझादनगर, वापी (गुजरात) वर रीतसर कायदेशीर कारवाई भारतीय वन अधिनियम १९२७ चे कलम, ४१, ४१२ ब व मुंबई वन नियम १९४२ चे कलम ६६ नुसार केली. अशाप्रकारे जवळजवळ १७ लाख किंमतीचा मुद्देमाल पोलादपूर वनविभागाने जप्त केला. त्यामुळे सदर कारवाईने महाड आणि पोलादपूर तालुक्यामधील लाकूड तस्कर चांगलेच धास्तावले असून पोलादपूर वनविभागाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## नेरे सबस्टेशनच्या कामाला ग्रहण

मात्र वारंवार विद्युत पुरवठा खंडित होत असल्याने त्याचा नाहक त्रास वीज ग्राहकाना होत आहे. नेरे परिसराचा झपाट्याने विकास होत आहे, मोठ्या प्रमाणात इमारती उभ्या राहत आहेत त्यामुळे नागरिक वास्तव्यास येत आहेत. नेरेला विद्युत उपकेंद्र झाले तर ८० किलोमिटरची लाईन आहे, त्याच्यात तीन-चार लाईन बनतील. मुख्य ट्रांसफार्मर बसवला जाईल. त्यातुन तीन ते चार फीडर काढता येतील. त्यामुळे विद्युत पुरवठा सुरळीत ठेवण्यास मदत होईल. ज्या ठिकाणाची लाईट जाईल त्या ठिकाणची समस्या शोधून विद्युत पुरवठा सुरळीत करणे लवकर शक्य होईल. त्यामुळे महावितरणचा देखील त्रास कमी होईल.

## आदिवासी वाडयांचा मालमत्ता कर रद्द करण्याची शिवसेनेची आयुक्तांकडे मागणी

तातडीने पनवेल महानगर पालिकेने आदिवासी वाडयांचा मालमत्ता कर रद्द करण्याची मागणी शिवसेना व युवा सेनेने आयुक्त गणेश देशमुख यांच्या कडे केली आहे .

आयुक्त गणेश देशमुख यांची भेट युवासेना उपजिल्हा अधिकारी पनवेल विधानसभा अवचित राऊत, खारघर शहर संघटक अनिल पाटील, पनवेल उपतालुकासंघटक शंकरशेठ ठाकूर, खारघर विभागसंघटक रामचंद्र देवरे, विभागप्रमुख उत्तम मोर्बेकर, युवासेना पनवेल उपतालुका अधिकारी अनिकेत पाटील, खारघर विभाग अधिकारी प्रेम ठाकूर, युवासैनिक रोशन पाटील व खारघर फणसवाडी, हैदरवाडी, चाफेवाडी व बेलपाडा वाडी येथील आदिवासी बांधव यांनी घेऊन सदरील आदिवासी वाड्यातील रहिवासी नागरीक हे मातीच्या घरात राहुन आपले व आपल्या कुटुंबाचे जीवन जगत असतात. त्यांना ग्रामपंचायत कार्यालयाकडून विविध योजनांच्या माध्यमातुन मोफत घरे बांधुन देण्यात आलेली आहेत. आजच्या घडीलाही त्यांची आर्थिक परिस्थिती दुर्बल असुन अवाजवी मालमत्ता कर सरसकट लादण्यात आलेला आहे. तो अन्याय कारक आहे, आदिवासी बांधवांच्या मागणी नुसार त्यांना ग्रामपंचायती प्रमाणे नाममात्र मालमत्ता कर आकारल्यास हरकत नसेल असे यावेळी युवासेना उपजिल्हा अधिकारी पनवेल विधानसभा अवचित राऊत यांनी आयुक्त गणेश देशमुख यांना सांगितले.


**जाहीर नोटीस**

जा.क्र.म्हनपं/जाहीर नोटीस/ २६६ / २०२२ दिनांक :- ०५/०५/२०२२

महाराष्ट्र नगर परिषदा, म्हसळा नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम १३० नुसार आवश्यक असल्याप्रमाणे खालील मालमत्तेच्या हस्तांतरणासंबंधाने म्हसळा नगरपंचायतीस प्राप्त झालेल्या मालमत्ताधारकांच्याप्रकरणपरत्वे अनुसूची २ व ३ मधील नोटीसीनुसार सदर हस्तांतरण संदर्भाने कोणाच्याही हितसंबधाने हरकत अगर आक्षेप असल्यास सदरची नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसाच्या आत हितसंबधाच्या व हरकतीच्या लेखी पुराव्यासह म्हसळा नगर पंचायतीकडे लेखी स्वरूपात हरकत नोंदवावी. अन्यथा कर वसुलीच्या सोईसाठी सदर हस्तांतरण करुन नगरपंचायत दप्तरी याबाबतची नोंद घेतली जाईल.

| अ. क्रं | अनुसूची | अनुसूची पुस्तकातील क्रमांक / मालमत्ता क्रंमाक | मालमत्तेचे ठिकाण | मालमत्तेचे स्वरुप | ज्यांचे नावे मालमत्ता आहे त्यांचे म्हणजे मालमत्ता विकणाऱ्यांचे किंवा अभिहस्तांकन कर्त्याचे नांव | खरेदीदाराचे किंवा अभिहस्तांकन कर्त्याचे नांव |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | १८७४ पैकी | दिघीरोड | कमर्शियल आर. सी. सी. पद्धतीत बांधलेली इमारत तळ मजला गाळा नं. ०२ | सिमा श्रीकांत शिरोडकर सुबोध श्रीकांत शिरोडकर | समीर अब्दुल शकूर गणतारे |
| २ | २ | ५३० पैकी | काझी मोहल्ला | कमर्शियल आर. सी. सी. पद्धतीत बांधलेली G + २ ची इमारत तळ मजला गाळा नं. ३ | हलीमाबी म हसन हुर्जुक | साजीया अदनान पसवारे |
| ३ | २ | १२११ पैकी | नवानगर | आयशा रेजीडेन्सी आर. सी. सी. पद्धतीत इमारत दुसरा मजला फ्लॅट नं. २०३ | शाहिद महमद अली सरखोत | सहर सुफीयान नजीर |
| ४ | २ | ६८४ पैकी | श्रीवर्धन गोरेगाव रोड | मुंगये कॉम्प्लेक्स आर. सी. सी. पद्धतीत बांधलेली इमारत दुसरा मजला फ्लॅट नं. २०३ | निलिमा कृष्णा नगराळे ऋषिकेश कृष्णा नगराळे निकिता नितीन जिटीथोर | गजाला फैरोज धनशे फैरोज युसुफ धनशे |
| ५ | २ | १८६६ पैकी | नवानगर | आसमा अपार्टमेंट आर. सी. सी. पद्धतीत बांधलेली इमारत स्टील १,२,३ दुसरा मजला A विंग फ्लॅट नं. २०४ | अशफाक सादुल्ला खमकर अब्दुल सलाम हुसैन हुर्जुक | जमीर अहमद हसन उकये |
| ६ | २ | १६८९ पैकी | श्रीवर्धन गोरेगाव रोड | कमर्शियल सनाबील अपार्टमेंट आर. सी. सी. पद्धतीत बांधलेली इमारत तळ मजला गाळा नं. ६ | फरकंदा निजामुद्दीन उभारे | रुक्साना हसन वस्ता |
| ७ | २ | ११८४ पैकी | कन्याशाळा परिसर | आर. सी. सी. पद्धतीत बांधलेली इमारत A विंग पहिला मजला फ्लॅट नं. १०१ | ललीत कुमार सोहनलाल छिपा | अन्वी अमेय कदम |

सही/- XXX
मुख्याधिकारी
म्हसळा नगरपंचायत



महाराष्ट्र शासन

महाराष्ट्र शासन कृषी विभाग

उपविभागीय कृषी अधिकारी, कार्यालय खोपोली, जि.रायगड

पत्ता : शेतकीफार्म, शिळफाटा खोपोली, ता.खालापूर, जि.रायगड पिन क्र.४१०२०३

फोन/फॅक्स नं.०२१९२-२६३३०८ ई-मेल sdaokhopoli@yahoo.co.in

**निविदा सुचना क्र.१ सन २०२२-२०२३**

उप विभागीय कृषी अधिकारी, खोपोली, जि.रायड महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागाकडून कर्जत तालुक्यतील कामासाठी अनुभवी संस्थांकडून खालील कामांकरिता बी-१ नमुन्यातील निविदा प्रणालीद्वारा (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत.

| अ.क्र. | घटक | भौतिक (संख्या) | निधी (लाखात) |
|---|---|---|---|
| १ | उल्हास नदीवरील जलपर्णीमुळे होणारे जलस्त्रोतांचे प्रदुषण व जलपर्णीचे अतिक्रमण थांबवून जलस्त्रोतांचे शुद्धीकरण व पुनरुज्जीवन करणे Phase-II | १ (३० कि.मी.) | २४.०० |

निविदा उपलब्ध कालावधी : दिनांक ०९/०५/२०२२ ते १६/०५/२०२२

निविदा उघडणे : १७/०५/२०२२ सकाळी ११.०० वाजता

सदर निविदेमध्ये काही बदल होणार असल्यास शासनाच्या www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर व उपविभागीय कृषी अधिकारी, खोपोली कार्यालयातील सुचना फलकावर पहावयास मिळेल.

सही/-
(बालाजी श्रीरंग ताटे)
उप विभागीय कृषी अधिकारी
खोपोली, जि.रायगड

क्र.जिमाका/राअ/जाहि/२३/२०२२-२३


हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## नागोठणे येथे मनसेच्या वतीने महाआरती व हनुमान चालिसा पठण

**दै.रायगड नगरी । नागोठणे**

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राजसाहेब ठाकरे यांच्या आदेशानुसार महाराष्ट्र नवनिर्माण सेना नागोठणे विभागाच्या वतीने बुधवार दि. ४ एप्रिल रोजी सकाळी ११ वाजता नागोठणे येथील श्री. हनुमान मंदिरात कार्यकर्त्यांमार्फत महाआरती व हनुमान चालिसा पठण करण्यात आले.

यावेळी मनसेचे रोहा तालुका सचिव साईनाथ धुळे, रोहा तालुका महिला सेना अध्यक्षा दिपश्री घासे, मनसे रोजगार व स्वयंरोजगार विभाग जिल्हा संघटक प्रह्लाद पारंगे, नागोठणे विभाग अध्यक्ष गोरखनाथ पारंगे, नागोठणे शहर उपाध्यक्ष पवन जगताप, शितल जगताप, मनोज पारंगे, अंकुश पाटील आदी कार्यकर्ते उपस्थित होते. दरम्यान मनसेच्या कार्यकर्त्यांनी हा कार्यक्रम अत्यंत शांततेत पार पाडला तसेच यावेळी नागोठणे पोलिस निरीक्षक तानाजी नारनवर यांच्या मार्गदर्शनाखाली चोख पोलिस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

## आठ लाख दहा हजार रुपयांच्या किराणा मालाची कंपनीतून चोरी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

आठ लाख दहा हजार ५९५ रुपयांचा किराणामाल कंपनीतून चोरी केल्याचा प्रकार धानसर येथे उघडकीस आला आहे. आरोपींविरोधात तळोजा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

धानसर येथे मिराबो प्रायव्हेट लिमिटेड कंपनी अदानी कंपाउंड आहे. कंपनीत अवेस मोमीन व अदनान शेख हे डिस्पॅच सुपरवायझर म्हणून काम करतात. कंपनीचे ऑडिटर निलेश वर्मा यांनी रूटीन चेकअप केले असता प्रिया ऑईलचा १५ लिटर डब्यांचा स्टॉक मध्ये पंचवीस डबे कमी असल्याचे निदर्शनास आले. सीसीटीवी फुटेज चेक केले असता रोहित ट्रान्सपोर्ट यांच्याकडील चालक अनिकेत पवार यांच्या टेम्पोमध्ये १५ लिटरचे पंचवीस डब्बे जास्त लोड केले असल्याचे दिसून आले. यावेळी सुपरवायझर अवेस मोमीन, अदनान शेख, सिक्युरिटी गार्ड केशव पाल, चालक अनिकेत पवार यांच्याकडे चोरीबाबत विचारपूस केली.

यावेळी सिक्युरिटी केशव पाल आणि अनिकेत पवार यांनी सदरची चोरी डिस्पॅच सुपरवायझर अवेस मोमीन आणि अदनाम शेख यांच्या सांगण्याप्रमाणे केल्याचे कबूल केले. चौघाविरोधात तळोजा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

# मोटर पंपाच्या अतिरेकी वापरानेच माणगांवात नळाला पाणी येतय कमी दाबाने

**दै.रायगड नगरी । उतेखोल/माणगाव**

माणगांवात जवळपास सर्वच भागात सध्या घरगुती नळाला कमी दाबाने पाणी येत असल्याची तक्रार वाढली आहे. पाणी पुरवठा सर्वांना समान करता यावा या साठी नगरपंचायत नगराध्यक्ष व पाणी पुरवठा सभापती प्रयत्नशिल असुन जलशुध्दी केंद्रातील गळती रोखण्यात यश मिळविले, लाखो लिटर पाणी गळती दूर झाली आहे. तरी सुध्दा पाणी पुरवठा कमी दाबाने होत असल्याची बोंबा बोंब आहे. याची कारणमिंमासा केली असता, व पाणी पूरवठा कर्मचारी यांचेशी संवाद साधला असता, आता माणगांव मधिल वाढती लोकसंख्या, वाढते कॉम्प्लेक्स, वसाहती मधुन अनेकजण पाणी साठा व पाणी वेगाने मिळविण्यासाठी मोटर पंप लावत असल्याचे वास्तव समोर आले आहे. कॉम्प्लेक्स मध्ये अनेक कुटुंब आहेत पण कनेक्शन मात्र एक दोनच असतात हे वास्तव आहे.



जवळपास अनेक घरातुन लाईनवर पंप लावले गेले आहेत. ज्या दिवशी वीज खंडित होते, त्यावेळी त्या त्या भागात पाणी सुटले असले तर पुरवठा योग्य दाबाने व सर्वदूर पाणी सुरळीत मिळते. हे वास्तव सर्वच जण बोलुन दाखवितात, परंतु पंप लावणे मात्र कोणीही बंद करत नाहीत. प्रभागातील लाईनला पाणी दीड ते दोनतास येते परंतु पंप लावण्याने ते कमी जास्त दाबाने लोकां पर्यंत पोहचते. यासाठी लोकांनी लाईनला पाणी येताच एकतर आपल्याला मिळालेल्या दीड ते दोन तास या वेळेत योग्य नियोजन केले तर सर्वांना पाणी योग्य दाबाने मिळेल. यासाठी लाईनला पाणी सुरु होताच पहिले एक तास तरी पंप लावू नयेत, तर लाईनवरील शेवटच्या टोकापर्यंत पाणी सुरळीत मिळेल. त्यानंतर शेवटचा एक ते अर्धा तासच पंप चालु केल्यास आपलीही गरज भागेल. आपल्या गरजेसह दूसरे ग्राहकांची गरज लक्षात घेता असा बदल प्रत्येक ग्राहकाने समजुतीने घेतल्यास, पाणी पूरवठा समान होईल.

यासाठी आपल्यातच बदल केला तरच पाणी पूरवठा सर्वसमावेशक समान होईल अन्यथा कितीही प्रयत्न केला तरी सर्व व्यर्थ आहे. नदीची पाणी पातळी अजुन तरी व्यवस्थित आहे. परंतु कडक उन्हाळा व पाण्याची गरज लक्षात घेता पाणी जपून वापरावे लागेल. कालव्याचे पाणी बंद होणे तसेच तांत्रीक बिघाड, खंडीत विज पूरवठा व भारनियमनाची टांगती तलवार आहे. यामुळे येणारे दोन महिने पाणी जपून वापरा तरच पावसाळ्यापर्यंत आपल्याला पाणी सुख लाभेल. अन्यथा बोंब मारुन हा पाणी प्रश्न सुटणारा नाही. यासाठी सर्वांनी समजुतीने सहकार्य करावे, असे जाणकार माणगांवकर व पाणी पुरवठा कर्मचाऱ्यांचे म्हणने आहे.

एकमेका सहाय्य करु अवघे धरु सुपंथ या उक्ती प्रमाणे मी माझे कर्तव्य करावे, एकमेका पाणी पूरवु जपून वापरु अवघे निभावू पाणी धर्म! भविष्यात लाईन वरील पंप काढण्याची सक्तीची मोहीम नगरपंचायतीला राबवावी लागण्यापेक्षा आपणच एकमेकाला सहकार्य केले तर पाणी प्रश्न सुटेल, अन्यथा आपल्यापुढे अन्य दूसरा पर्याय उरलेला नाही. हे मात्र उघड कटुसत्य ऐरणीवर आले आहे. पाण्याच्या मोठ्या स्किम आणण्यासाठी आणखी प्रयत्न सुरु आहेत परंतु पाण्याचे सुख लाभलेला माणगांव आणि त्याचा लौकिक टिकविणे सर्वस्वी आपलीच जबाबदारी आहे हे मात्र निश्चित आहे.

# प्रेमा लक्ष्मण विद्यालय यांच्या सौजन्याने शिवकालीन शस्त्रविद्या प्रशिक्षण केंद्र सुरु



**दै.रायगड नगरी । माथेरान**

छत्रपती शिवाजी महाराज की जय, जय भवानी जय शिवाजी या घोषणांनी भारावून गेलेल्या वातावरणात शिवकालीन मर्दानी खेळ प्रशिक्षण शिबिराला सुरुवात झाली. शिबिरात प्रशिक्षक यांनी लाठी-काठी फिरविण्याची कला शिकण्यास सुरुवात केली. या शिबिराला चिमुकल्यांसह विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

निर्बादेवी युवा मित्र मंडळाचे अध्यक्ष लक्ष्मण कांदळगावकर, कुकिवॉन चीफ मुंबई ताएकवोनडू हार्दिक उनडकर, लाठी काठी प्रशिक्षक वस्ताद सुधीर कांबळे, प्रेमलक्ष चॅरिटेबल ट्रस्टचे कार्याध्यक्ष दिपेश गावंड,शाळेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मनजीत कौर यांच्या उपस्थितीत शिवकालीन लाठीकाठी स्वसंरक्षणासाठी प्रशिक्षण क्रीडा शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. प्रेम लक्ष चॅरिटेबल ट्रस्ट संचलित प्रेमा लक्ष्मण विद्यालय संलग्न शिवशंभू मर्दानी अखाडा यांच्या वतीने शिबिराचे आयोजन केले. शिबिरात बनाटी, बाणा, ढाल तलवार, दाण पट्टा, चौकड, भाला, खंजीर, तोफ तलवार, डबल बनाटी, डबल पट्टा, सांबर शिंगे, सिलंबम, अष्टूडो आखाडा अशी विविध शस्त्रास्त्रे चालवण्याची माहिती प्रशिक्षक सुधीर कांबळे यांनी दिली. नंदा हरेश गावंड स्पोर्ट्स आरिना मैदान येथे संध्याकाळी सात ते नऊ या वेळेत प्रशिक्षण देण्यात येणार आहे.

लाठी काठी म्हणजे आपल्या महाराष्ट्राचा पारंपरिक व शिवकालीन ऐतिहासिक वारसा प्राप्त असलेली युद्धकला. अशी ही युद्धकला अभ्यासाच्या स्वरूपात येणाऱ्या नव्या पिढी आत्मसात करता यावी यासाठी वस्ताद प्रशिक्षक सुधीर कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देण्यात येत आहे. यासाठी आजच आपला प्रवेश निश्चित करा असे संस्थेचे कार्याध्यक्ष दिपेश गावंड यांनी सांगितले.

# विंधणे आदिवासी वाडीवर विविध प्रकारचे दाखले वाटप



**दै.रायगड नगरी । उरण**

रायगडचे जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर यांच्या संकल्पनेतून कातकरी उत्थान अभियान अंतर्गत उरण तालुक्यातील विंधणे आदिवासी वाडीवर तहसिलदार भाऊसाहेब अंधारे यांच्या उपस्थितीत काल दिनांक ५ मे २०२२ रोजी विविध प्रकारचे दाखले वाटपाचा कार्यक्रम संपन्न करण्यात आला.

यावेळी त्यांनी आदिवासी बांधवाना मार्गदर्शन करताना म्हणाले की तालुक्यात एकही आदिवासी बांधव कोणत्याही दाखल्यासाठी वंचित राहणार नाही किंवा कोणत्याही योजने पासून वंचीत राहणार नाही, यासाठी आम्ही आमची टीम सातत्याने काम करीत आहोत.या बांधवाना रेशनकार्ड कार्ड मिळाले आहे त्याना ही लवकर अंत्योदय योजनेतुन धान्य दिले जाईल.आज पर्यत तालुक्यात ८० ते ९० टक्के जातीचे दाखले पूर्ण झाले आहेत.असेही त्यांनी यावेळी नमूद केले आहे.

आपला समाजाने पुढे यायचे असले तर घरातील प्रत्येक स्त्रीने कुटुंबाकडे लक्ष दिले पाहिजे आपल्या मुलाचे आरोग्य चांगले ठेवण्यासाठी त्यांची रोज साबणाने आंघोळ केली पाहिजे, त्यांना स्वच्छ कपडे घातले पाहीजे मुलांच्या खाण्याकडे कडे लक्ष केंद्रित केले पाहिजे तरच आपला मुलगा निरोगी राहू शकेल मुलांना शाळेची ओढ लावली पाहिजे मुले शाळेत गेली तरच आपले भविष्य घडवू शकतील परंतु हे सर्व येथे बसलेल्या सर्व महिलांवर आहे.असे मार्गदर्शन नायब तहसिलदार नरेश पेढवी यांनी उपस्थितांना केले.

आदिवासी महिलांनी आपले आदिवासी नृत्य सादर करून उपस्थित पाहुण्यांचे स्वागत केले. यावेळी जातीचे दाखले, रेशनकार्ड, वनहक्क दाखले, आदी दाखले वाटप करण्यात आले. यावेळी उरण सामाजिक संस्थेचे प्रा राजेंद्र मढवी, केअर ऑफ नेचर संस्थेचे राजू मुंबईकर, विंधणे उपसरपंच भारत डाकी, महसूल सहायक शिवाजी सुर्यवाड, मंडळ अधिकारी एस. आर. रोडे, अर्थ महा इ सेवा केंद्राचे अजय ठाकूर, वनरक्षक शितल पाटील, विंधणे पोलीस पाटील शुभांगी पाटील, तलाठी अर्जुन जमखंडी, सामाजिक कार्यकर्ते नामदेव ठाकूर, दत्ता गोंधळी, विशाल पाटील, अनिल घरत, शिक्षक राजेश चौगले, मनिष कातकरी, मुख्याध्यापक संदीप पाटील वाडीतील महिला पुरुष तसेच विद्यार्थी उपस्थित होते

# मुंबई गोवा महामार्गावर नागोठणे कोलेटी हद्दीत केमिकलयुक्त टँकर पलटी

**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**

मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्गावर नागोठणे पोलीस स्टेशनच्या हद्दीत कोलेटी गावाच्या नजीक रात्री च्या सुमारास टँकर वेगवान चालविल्याने पलटी झाला. यावेळी टँकर रस्त्यावर घेताना टँकर ची धड़क बसून मुंबईच्या दिशेने जाणारी दोन प्रवाशी कार (वाहने)यांनी पेट घेतला. याठिकाणी मुंबई गोवा महामार्ग एकेरी असल्याने वाहनांची लांबच लांब रांग लागली. या अपघाती घटनेनंतर तासनतास वाहतूक कोंडी झाली होती. तब्बल पाच तास या मार्गावर वाहतुकीचा खोळंबा झाला.

दोन जळीत वाहनातील प्रवाशी सुदैवाने बचावले, मात्र वाहने आगीत जळून खाक झालीत. नागोठने पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार व ऋषिकेश विनायक बागवे यांच्या फिर्यादिनुसार अपघातातील टँकर क्र एम एच ०४ केयु ५७३९ वरील चालक यांने त्याचे ताब्यातील टँकर वडखळ बाजुकडुन नागोठणे बाजुकडे मुंबई गोवा हायवेने चालवित घेवुन जात असताना त्यांनी त्याचे ताब्यातील टॅन्कर अतिवेगाने हयगयीने , अविचाराने , बेदरकारपणे रस्त्याचे परिस्थीतीकडे दुर्लक्ष करून चालविले.त्यामुळे टॅन्कर रोडचे खाली गेला असता तो रोडवर घेण्याचा प्रयत्न करीत असताना टॅन्कर उजव्या कुशीवर पलटी होवुन रोडवर घासत जावुन नागोठणे बाजुकडुन वडखळ बाजुकडे जाणारी इर्तिका कार नं एम एच ०८ ए.एन ५३४९ व हुन्डाई अल्काझर कार नं . एम एच ४६ बी झेड ४२३६ यांना ठोकर लागुन अपघात झाला.

सदर अपघातात दोन्ही कार ला आग लागुन त्या पुर्ण पणे जळुन नुकसान झाले. तसेच टॅन्करचे नुकसान होवुन त्यामध्ये असलेले केमिकल रस्त्यावर सांडुन नुकसान झाले .तसेच सदर अपघातात साक्षीदार दर्याकुवर खिमसिंह राजपुत यांना किरकोळ दुखापत झाली असुन आरोपीत हा अपघाताची खबर न देता पळुन गेला असल्याची नोंद करण्यात आली आहे. याप्रकरणी नागोठणे पोलिस स्थानकात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



# नागरिकांनी राज्य परिवहन महामंडळाच्या बसमधून प्रवास करावा : अनघा बारटक्के

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळातील कर्मचाऱ्यांचा संप संपुष्टात आलेला असल्याने रायगड राज्य परिवहन विभागातील सर्व आगारांमार्फत (महाड / अलिबाग / पेण / श्रीवर्धन / कर्जत / रोहा / मुरुड / माणगाव) दैनंदिन वाहतूक पूर्ण क्षमतेने सुरु करण्यात आली आहे. सद्य:स्थितीत रायगड राज्य परिवहन विभागातील सर्व आगारांमार्फत मिळून ८५० फेऱ्या सुरू आहेत. तरी नागरिकांनी राज्य परिवहन महामंडळाच्या बसमधूनच प्रवास करून राज्य परिवहन महामंडळाच्या सेवेचा लाभ घ्यावा, असे आवाहन विभाग नियंत्रक, पेण अनघा बारटक्के यांनी केले आहे.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, मौजे : शिरढोण, ता.पनवेल, जि.रायगड येथील महसूल दप्तरी खालील वर्णनाची शेतजमीन मिळकत श्री.अनंता नारायण राजगुडे, श्री.धनाजी नारायण राजगुडे, श्री.राम नारायण राजगुडे, रा.मु.गिरवले, ता.पनवेल, जि.रायगड यांचेकडून आमचे अशिल कायम खरेदी खताने विकत घेणार आहेत.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे : शिरढोण, ता.पनवेल, जि.रायगड**

| भूमापन क्र./ हिस्सा क्र. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|
| ८७/४ | जिरायती : ०-१२-४० <br> पोट खराबा वर्ग (अ) : ०-०१-०० <br> एकूण : ०-१३-४० | २.५० |
| क्षेत्र : १३.४० गुंठे क्षेत्र या खरेदी विक्रीच विषय आहे. | | |

वरील वर्णनाच्या जमीन मिळकतीबाबत कोणत्याही इसमाचा अगर संस्थेच्या साठेकरार विक्री, गहाण, दान, लिज, बक्षिसपत्र, चार्ज, फरोक्त, दावा, वारसाहक्क, लायसन्सी, लिन, टेनन्सी, विल, अन्नवस्त्र, पोटगी, ताबा कब्जा, हवाला, अदला बदल व येणे जाणेसाठी अथवा वहिवाटी वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास किंवा त्याच्या खरेदीखताच्या व्यवहारास हरकत असल्यास संबंधित व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत पुराव्यासह लेखी स्वरुपात पोस्टाने किंवा स्वतःहून हजर होवून आमचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसात कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही किंवा असल्यास तो हक्क हितसंबंध त्यांनी आमच्या अशिलांच्या लाभांत सोडून दिला असून त्याची आमच्या अशिलांच्या लाभात होणाऱ्या खरेदीखतास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येवून खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करण्यात येईल. त्यानंतर मागाहून कोणत्याही स्वरुपाची हरकत घेतल्यास ती हरकत आमच्यावर अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची नोंद घ्यावी.

दि.०४/०५/२०२२
स्थळ : पनवेल

सही/-
**ॲड.निवृत्ती बाळाराम पावशे**
**गाळा नं.४९, पहिला मजला, बिल्डींग नं.०३, पनवेल महानगरपालिका शॉपिंग कॉम्प्लेक्स, भाजी मार्केट जवळ पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड ४१०२०६ (मो.क्र.९८७००८८५९८)**

मे.सोनावणे सो.. यांचे कोर्टात

ॲड.राजकुमार व्ही. जाधव

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे न्यायालयात

दि.चौ.अर्ज क्रं.५९८/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.२२/०६/२०२२

कै.मोहन गंगाराम बेलोसे मयतचे वारस
श्रीमती.विमल महादेव बेलोसे
पुर्वाश्रमीची विमल गजानन पाटील
वय : ५७ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.अंधार आळी गिरोबा मंदिर जवळ, रोहा,
ता.रोहा, जि.रायगड — अर्जदार

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविण्यात येते की, अर्जदार ही कै.महादेव गंगाराम बेलोसे यांची पत्नी आहे. तसेच कै.महादेव गंगाराम बेलोसे यांची आई कै.दृपदा गंगाराम बेलोसे यांचे निधन मु.रोहा, ता.रोहा, जि.रायगड येथे राहत्या घरी झालेले आहे. तसेच कै.महादेव गंगाराम बेलोसे यांचे निधन दि.१५/१२/२०१३ रोजी मु.रोहा, ता.रोहा, जि.रायगड येथे राहत्या घरी झालेला असून अर्जदार श्रीमती.विमल महादेव बेलोसे पुर्वाश्रमीची विमल गजानन पाटील ह्यांनी कै.महादेव गंगाराम बेलोसे यांच्या मालकीची खालील वर्णनाची मिळकतीचे वारसपत्र मिळण्यासाठी अर्ज केलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे : नढाळ, ता.खालापूर, जि.रायगड**

| गावाचे नांव | स.नं./हिस्सा नं. | क्षेत्र | आकार |
|---|---|---|---|
| नढाळ | १६५/१९१ | ०-०१-८५ | 0.00 |
| | १६५/१९४ | ०-०१-८५ | 0.00 |

अर्जदार या कै.महादेव गंगाराम बेलोसे यांचे कायदेशीर वारस आहेत. ह्या हक्काबद्दल कोणाही व्यक्तीस हरकती घ्यावयाच्या असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एका महिन्याच्या आत ह्या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून हरकती घ्यावयाच्या आहेत. जर या कालावधीमध्ये योग्य त्या हरकती घेतल्या नाहीत तर हे कोर्ट अर्जदार यांच्या हक्काबद्दल पुरावा घेण्याची ताबडतोब कार्यवाही करेल आणि ते जर कै.महादेव गंगाराम बेलोसे यांच्या वारस पत्रास हक्कवार आहेत असे सिद्ध झाल्यास त्यांना हे वारसपत्र मंजूर करेल.

आज दि.४/०५/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल — (कोर्टाचा शिक्का) — सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल

मा.मुजावर साहेब यांच्या न्यायालयात

अर्जदाराचे वकील
ॲड.एस.एस.बनकर

## जाहीर नोटीस

मे.पनवेल येथील दिवाणी न्यायाधिश, वरिष्ठ स्तर यांचे न्यायालयात

दि.चौ.अर्ज क्रं.७३२/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.११/०७/२०२२

श्रीमती.शेवंती चद्रकांत मिरगळ
वय : ५७ वर्षे, व्यवसाय : गृहिणी
रा.रुम नं.३, भटवाडी, राम जोशी मार्ग,
कल्याणसिंग चाळ नं.०१, माता महाकाली मंदिर शेजारी,
घाटकोपर वेस्ट, मुंबई ४०००८४ — अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही — सामनेवाला

तमाम जनतेस या नोटीशीने कळविण्यात येते की, कै.सचिन चंद्रकांत मिरगळ यांचे निधन दि.०९ मे २०१८ रोजी राहत्या घरी म्हणजेच रुम नं.७०३, सातवा मजला, सॉलिटीर स्पेस को.ऑ.हौ.सो.लि., प्लॉट नं.ए-१०३, सेक्टर नं.०६, करंजाडे, नवी मुंबई-४१०२०६, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड येथे झाले असून वर नमूद अर्जदार श्रीमती.शेवंती चंद्रकांत मिरगळ, ह्या कै.सचिन चंद्रकांत मिरगळ यांची आई आहे.

तसेच कै.सचिन चंद्रकांत मिरगळ यांच्या मालकीची खालील वर्णनाची मिळकत आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | रुम नं. | क्षेत्र | रक्कम |
|---|---|---|---|
| करंजाडे पनवेल | रुम नं.७०३, सातवा मजला, सॉलिटीअर स्पेस को.ऑ.हौ. सो.लि., प्लॉट नं.ए-१०३, सेक्टर नं.०६, करंजाडे, नवी मुंबई-४१०२०६, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड | १९.९७९ चौ.मीटर कारपेट एरिया | रु.२३,३२,000/- |

सदर कै.सचिन चंद्रकांत मिरगळ यांच्या मृत्यूनंतर सदरहू अर्जदार हे त्यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदार यांच्या नावाची कै.सचिन चंद्रकांत मिरगळ यांचे वारस म्हणून नोंद होणे आवश्यक व गरजेचे आहे. त्याकरिता अर्जदार यांनी कै.सचिन चंद्रकांत मिरगळ यांचे कायदेशीर वारस असल्याचा वारस दाखला मिळविण्यासाठी मा.न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे. तरी अर्जदार यांना वारस प्रदान करण्याच्या कामी कोणाच्याही कसल्याही हरकती असल्यास त्यांनी सदरच्या हरकती ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या मे.न्यायालयात हजर होवून हरकती दाखल कराव्यात. मुदत संपल्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही व अर्जदार यांच्या लाभांत वारस दाखला दिला जाईल याची नोंद घ्यावी.

आज दि.०५/०५/२०२२ रोजी माझे सहीने व मा.न्यायालयाच्या शिक्क्यानिशी नोटीस दिली.

सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल — (कोर्टाचा शिक्का) — सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल

K.M.Sonawane Saheb

Process Paid — Adv For Applicant
Rs.12=50 — Mrs.Neha Rathore

## PUBLIC NOTICE

IN THE COURT OF CIVIL JUDGE SENIOR DIVISION, PANVEL, AT : PANVEL

Civil Misc. Appli. No.1390/2021
Exh No. 8

Mrs.Raj Kumari Sharma
Age : 45 years, occ.Housewife
Residing at : Flat No.A-302, Bldg No.04,
Type B, Mahalaxmi City, Nere,
Dist : Raigad, Maharashtra-410206 — Applicant
V/S
1) Smt. Sonam Sharma
Age : 28 years, occ.Housewife
Residing at : 92/92, Ram Nagar, Behind
Power house, Chandwar Gate, Firozabad
Uttar Pradesh : 283203
2) Master.Deepash D Sharma (Minor)
Through his mother as legal guardian
Age : 1 year 9 months,
Residing at : 92/92, Ram Nagar, Behind
Power house, Chandwar Gate, Firozabad
Uttar Pradesh : 283203 — Opponent/s

WHEREAS Late Shri.Deepak K Sharma Expired on dated 07/09/2020 at Medanta the Medicity Hospital, Gurgaon, Delhi NCR. Shri.Deepak K Sharma was 50% owner of a Flat having No.A-302, Bldg No.04, Type B, Mahalaxmi City, Nere, Dist : Raigad, Maharashtra-410206, jointly in the name of Keshav Dev Sharma and Deepak Keshavdev Sharma. Hence the deceased Shri.Deepak Keshavdev Sharma holds 50% share in the above mentioned property.

AND WHEREAS Mrs.Raj Kumari Sharma, Mother of the deceased have filed an application for grant of heirship certificate with respect to said flat before this hon'ble court.

AND WHEREAS if any person/s have any objection for grant of heirship certificate in favour of Mrs. Raj Kumari Sharma, Mother of the deceased they may take objection before this Hon'ble court on or before 30 days.

The next date is fixed on 15/06/2022

Given today under my hand and seal of the Court

Sd/- Jr.Clerk 1 st Jt.C.J.S.D.Panvel — (Court Seal) — Sd/- Asst.Superitent. 1 st Jt.C.J.S.D.Panvel

